**महाराष्ट्र शासन**
**आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
**DIRECTORATE OF AYUSH, MAHARASHTRA STATE, MUMBAI.**
**शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ०१.**
4th Floor, Government Dental Collage & Hospital Building, St.George Compound, D' mello Road, Mumbai - 01.
कार्यालय - दुरध्वनी व फॅक्स - ०२२-२२६२६००७ संचालक : ०२२-२२६२२२४७
ई-मेल : directorayurvedmaha@gmail.com वेबसाईट : www.mahayush.gov.in

जा.क्र. आसंमु/आयुष डॉक्टर-Training/२०२०/आयु-२/ दिनांक:- ०७-४-२०२०

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य,
सर्व शासकीय / शासन अनुदानीत / खाजगी विनाअनुदानीत आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी महाविद्यालये.

विषय- Training of AYUSH Doctors for COVID-१९ .

उपरोक्त् विषयाचे अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, COVID-१९ च्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाने राज्यातील सर्व नोंदणीकृत आयुष डॉक्टर्सना तातडीने विशेष प्रशिक्षण / Training देण्याचे निर्देश दिले आहेत, ज्यायोगे, राज्यामध्ये, COVID-१९ बाबत विशेषत: प्रशिक्षीत आवश्यक/पुरेसे डॉक्टर तातडीने उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

महाराष्ट्र राज्यातील सर्व नोंदणीकृत आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी डॉक्टर्सना केंद्र व राज्यशासनाने विहीत केलेले प्रशिक्षण अनुक्रमे महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन व महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल यांचे मार्फत देण्यात येणार आहे. सदरहू प्रशिक्षणाचा तपशील सदर दोनही कौन्सिलचे वेबसाईटवर लवकरच प्रसिध्द करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित कौन्सिलकडून सर्व डॉक्टर्सना आवश्यक ती माहिती देण्यात येणार आहे.

आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील अधिष्ठाता व प्राचार्य यांचेसह सर्व नोंदणीकृत आयुष डॉक्टर्सना उपरोक्त वेबसाईटवरील सदरहू प्रशिक्षण ऑनलाईन द्वारे तातडीने पूर्ण करुन त्याबाबतचे प्रत्येक डॉक्टरचे प्रमाणपत्र दि.११-४-२०२० पर्यंत सादर करावयाचे आहे.

शासनाने, कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाबाबत विहीत केलेल्या "महाराष्ट्र कोविड-१९ (COVID-१९) उपाययोजना नियम - २०२०" या अत्यायिक कायदयाअंतर्गत सदरहू प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे, अन्यथा संबंधितांविरुध्द सदरहू कायदयाअंतर्गत योग्य कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आपणास निर्देशीत करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सर्व डॉक्टर, पदव्युत्तर विद्यार्थी व आंतरवासीय प्रशिक्षणार्थी यांचेकडून सदरहू प्रशिक्षण पूर्ण करुन घेऊन त्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित डॉक्टरांकडून आपणास प्राप्त झाल्यानंतर त्याचा अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.

( वैद्य कुलदीप राज कोहली )
संचालक आयुष,
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत - माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव -

(१) प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, मुंबई
(२) प्रबंधक, महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल, मुंबई
(३) मा.कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक